2026 III 16 - 1100

२०२६ . ०३ . १६ - ११००

# N 962

Seat Number
बैठक क्रमांक

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**Time : 2 Hours** **SOCIAL SCIENCES (73) HISTORY & POLITICAL SCIENCE—PAPER–I (M)**

**वेळ - २ तास** **सामाजिक शास्त्रे (७३) इतिहास व राज्यशास्त्र—पेपर-१ (म)**

**(REVISED COURSE)**

**Pages - 11** **Total Marks : 40**

**पृष्ठे - ११** **एकूण गुण - ४०**

---

**सूचना :—** (1) *सर्व* कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.

(4) प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील संकल्पनाचित्रे/कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने/पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(5) प्रश्न 1ला (अ), (ब) व प्रश्न 6वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेली असल्यास तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

P.T.O.

**1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 3**

(1) जगातील सर्वात प्राचीन संग्रहालय ............................... या शहराचे उत्खनन करताना सापडले.

(अ) दिल्ली

(ब) हडप्पा

(क) उर

(ड) कोलकाता

(2) महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार ........................ यांना मानतात.

(अ) संत ज्ञानेश्वर

(ब) संत तुकाराम

(क) संत नामदेव

(ड) संत एकनाथ

Seat Number
बैठक क्रमांक

(3) आधुनिक इतिहासलेखनाचा जनक .......................... यास म्हणता येईल.

(अ) व्हॉल्टेअर

(ब) रेने देकार्त

(क) लिओपॉल्ड रांके

(ड) कार्ल मार्क्स

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक संचातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा :** **3**

(1) (*i*) प्रभाकर – आचार्य प्र. के. अत्रे

(*ii*) दर्पण – बाळशास्त्री जांभेकर

(*iii*) दीनबंधु – कृष्णराव भालेकर

(*iv*) केसरी – बाळ गंगाधर टिळक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (2) | (*i*) | बाळंभट देवधर | – | मल्लखांब |
| | (*ii*) | खाशाबा जाधव | – | फुटबॉल |
| | (*iii*) | मेजर ध्यानचंद | – | हॉकी |
| | (*iv*) | सचिन तेंडूलकर | – | क्रिकेट |
| (3) | (*i*) | महाराज सयाजीराव विद्यापीठ | – | दिल्ली |
| | (*ii*) | बनारस हिंदू विद्यापीठ | – | वाराणसी |
| | (*iii*) | अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी | – | अलिगढ |
| | (*iv*) | जिवाजी विद्यापीठ | – | ग्वालियर |

# 5/N 962

Seat Number
बैठक क्रमांक

**2.** **(अ)** **दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही *दोन*) :** **4**

(1) दूरदर्शनशी संबंधित पुढील कालरेषा पूर्ण करा :




(2) पुढील वृक्षतक्ता पूर्ण करा :




(1) ........................ (1) ........................

(2) ........................ (2) ........................

(3) पुढील तक्ता पूर्ण करा :

| **जगप्रसिद्ध वस्तुसंग्रहालये** | **देश** |
|---|---|
| (*i*) लुव्र संग्रहालय | ...................... |
| (*ii*) ..................................................... | इंग्लंड |
| (*iii*) सालारजंग म्युझियम | ...................... |
| (*iv*) ..................................................... | युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका |

**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही *दोन*) :** **4**

(1) राष्ट्रवादी इतिहासलेखन

(2) उपयोजित इतिहास

(3) मार्को पोलो.

Seat Number
बैठक क्रमांक

**3.** **पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही *दोन*) :** **4**

(1) कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

(2) विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

(3) स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.

(4) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्त्वाचा आहे.

**4.** **दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

**सोहगौडा ताम्रपट :** हा ताम्रपट सोहगौडा (जिल्हा गोरखपूर, उत्तरप्रदेश) येथे सापडला. हा ताम्रपट मौर्य काळातील असावा असे मानले जाते. ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राम्ही लिपीत आहे. लेखाच्या सुरुवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे प्राचीन आहत नाण्यांवरही आढळतात.

चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे. या कोठारघरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

**प्रश्न :**

(1) सोहगौडा ताम्रपट कोणत्या काळातील असावा असे मानले जाते ? 1

(2) सोहगौडा ताम्रपटावरील कोरीव लेख कोणत्या लिपीत आहे ? 1

(3) सोहगौडा ताम्रपटाचे इतिहासातील महत्त्व सांगा. 2

**5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) : 6**

(1) भारतातील मुस्लीम स्थापत्यशैलीची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

(2) आकाशवाणीचा इतिहास सांगा.

(3) मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्यातील फरक स्पष्ट करा.

(4) ऐतिहासिक स्थळांच्या जतनासाठी आपल्याला कोणती काळजी घेणे गरजेचे असते ते सांगा.

# 9/N 962

Seat Number
बैठक क्रमांक

**6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 2**

(1) संविधानाच्या मूलभूत चौकटीला धक्का न लावता संविधानात बदल करण्याचा अधिकार .................................. आहे.

(अ) संसदेला

(ब) लोकांना

(क) राष्ट्रपतींना

(ड) उपराष्ट्रपतींना

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी ...................... करण्यात आली.

(अ) जलक्रांती

(ब) हरितक्रांती

(क) औद्योगिकक्रांती

(ड) धवलक्रांती

P.T.O.

**7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही *दोन*) : 4**

(1) सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने राखीव जागांची तरतूद महत्त्वाची आहे.

(2) एखाद्या घटकराज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्यायच्या हे राज्यसरकार ठरवते.

(3) निवडणुकीतील भ्रष्टाचारामुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास उडू शकतो.

**8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही *एक*) : 2**

(1) प्रादेशिकता

(2) लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व.

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही *एक*) : 2**

(1) दिलेला आकृतिबंध पूर्ण करा :



Seat Number
बैठक क्रमांक

(2) दिलेला आकृतिबंध पूर्ण करा :




**9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक) : 2**

(1) मुक्त व न्याय्य निवडणुका घेण्यासमोरील आव्हाने स्पष्ट करा.

(2) राजकीय प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ?